

# ब्रॉयलर पक्षांची घरे - जागेची निवड व रचना

कोंबडीपालन व्यवसायाचे भवितव्य हे बऱ्याच अंशी पक्षी घराच्या जागेवर अवलंबून आहे. पक्षीघरासाठी जागेची निवड करताना खालील मुद्दे लक्षात घ्यावेत.

१) जागेत नैसर्गिक खेळती हवा असावी.
२) जागा सखल भागात असावी, दलदलीची नसावी.
३) जमीन मुरमाड नसावी.
४) जागा शहरात अथवा भर वस्तीत नसावी.
५) जागेच्या ठिकाणी पाण्याची व विजेची सोय असावी.
६) जागेची निवड करताना जमीनीचा तुकडा सहसा आयताकृती असावा.

पक्षीगृहाची दिशा पूर्व-पश्चिमच असावी. पक्षीगृह उभारताना त्यांना लागणाऱ्या जागेचा विचार करून घर उभारावे. सुरुवातीच्या काळामध्ये प्रत्येक पक्षाला ०.५ चौ. फूट जागा मिळेल व नंतरच्या काळामध्ये प्रतिपक्षी १०० चौ. फूट जागा मिळेल अशाप्रकारे घर उभारावे. उदा. २००० ब्रॉयलर पक्षांसाठी १००० चौ. फूट जागा मिळेल अशी घरबांधणी करावी.

**ब्रॉयलर पक्षीगृहाची रचना व बांधणी :**

१) पक्षीगृहाची लांबी कितीही ठेवली तरी चालते परंतु रूंदीवर मात्र मर्यादा येते. जास्तीत जास्त ३० फूट (सरासरी २८ फूट) रूंदी असलेल्या घरात योग्य वायुवीजन व प्रकाश राहतो.
२) घराचा पाया दगड आणि चुन्यात बांधून पक्का केल्यास घराचा टीकाऊपणा वाढतो.
३) घराची जमीन आजूबाजूच्या जमीन सपाटीपेक्षा २ फूट उंचीवर असल्यास घराला ओल येत नाही. तसेच पक्षी घराची जमीन सिमेंट काँक्रीटची पक्की तयार करून घ्यावी. त्यामुळे जमीन धुवून स्वच्छ करण्यासाठी सोपे जाते.
४) घरांना रुंदीचे बाजूने छप्परापर्यंत भिंत (चांदई) बांधाव्यात. त्या भिंतीत ६फूट उंच व ३ फूट रुंदीचा दरवाजा ठेवावा.
५) घराच्या लांबीच्या बाजूने १ फूट उंचीच्या विटांच्या भिंती बांधाव्यात. त्यावर पक्षीगृहात हवा आणि प्रकाश खेळता राहण्यासाठी ७ फूट उंचीची २ X २५ आकाराची जाळी बसवावी.
६) घरांना लांबीच्या दोन्ही बाजूस १० फूट अंतरावर (फूट उंचीचे लोखंडी अथवा सिमेंटचे खांब बसवावेत आणि त्यावर कैच्या चढवाव्यात.
७) कैच्यावर दुपाखी छप्पर इतर लोखंडी अँगलच्या सहाय्याने बसवावे. छप्परासाठी सिमेंटचा पत्रा वापरणे फायदेशीर ठरते.
८) दोन्ही बाजूस छप्पराचा पत्रा साधारणतः ३ फूट बाहेर काढल्याने पक्षीगृहात येणारा पाऊस रोखता येतो.
९) पक्षीगृहाची मधली उंची (सड्याजवळची) १२ ते १५ फूट ठेवावी. त्यामुळे छप्परास योग्य ढाळ मिळून पावसाचे पाणी झटकण ओघळून जाते.

पक्षीगृहाची बांधणी आणि जागेची निवड वरीलप्रमाणे केल्यास याचा फायदा निश्चितच होईल.


प्रकाशन

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत



www.mafsu.in

www.knpcvs.in

✲ मार्गदर्शक ✲

कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

डॉ. एस. व्ही. उपाध्ये
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

डॉ. एन. व्ही. कुरकुरे
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

डॉ. ए. यु. भिकाने
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

डॉ. व्ही. डी. आहेर
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ लेखक ✲

डॉ. व्ही. डी. लोणकर
डॉ. ए. एस. कदम
कुक्कुटपालनशास्त्र विभाग
क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

✲ संकलन ✲

डॉ. स्मिता आर. कोल्हे
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.